# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मौजे तेर (ता.जि.उस्मानाबाद) येथील चैत्यगृहाचे काम निधीअभावी बंद असल्याबाबत

**(१) १९३८ (२२-१२-२०१४). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तेर (ता.जि.उस्मानाबाद) येथील चैत्यगृहाचे काम निधीअभावी बंद असल्याचे माहे सप्टेंबर, २०१४ च्या पहिल्या सप्ताहास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर कामास निधी उपलब्ध करुन सदर चैत्यगृहाचे काम करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१७-०४-२०१७) :** (१) नाही, मौजे तेर (ता.जि.उस्मानाबाद) येथील चैत्यगृहाच्या कामास सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून निधी देण्यात आलेला नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नाशिक जिल्हयातील दलितवस्त्यांतील विकास कामांबाबत

**(२) ५५२६ (०७-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील दलितवस्त्यात विकास कामे व कोणत्याही सुधारणा करण्यात आल्या नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आदिवासी वस्त्यांमध्ये विकास कामे तसेच सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-०५-२०१७) :** (१), (२) व (३) हे खरे नाही. तथापि, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेंतर्गत नाशिक जिल्ह्यातील दलित वस्त्यात समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांच्यामार्फत सन २०१४-१५ या वर्षात ३६७ विकासकामे मंजूर करण्यात आलेली असून त्यासाठी रुपये १५,३८,८९,०००/- गट विकास अधिकारी यांच्याकडे वर्ग करण्यात आलेले आहेत. सदर विकासकामांपैकी ११३ विकासकामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरित २५४ विकासकामे पंचायत समितीस्तरावर पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**नाशिक येथील पेठ रोडवरील आदिवासी मुलांसाठीच्या वसतीगृहात भोजन पुरवठा करणाऱ्या गुरुकृपा कंपनीच्या प्रतिनिधीने विद्यार्थ्यास मारहाण केल्याबाबत**

**(३) १६६०६ (३१-०७-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील पेठ रोडवरील आदिवासी मुलांसाठीच्या नवीन शासकीय वसतीगृहात भोजन पुरवठा करण्याचा ठेका असलेल्या गुरुकृपा कंपनीच्या प्रतिनिधीने या वसतीगृहातील विद्यार्थ्यास मारहाण केली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तसेच दोषी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१३-०४-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह, पेठ रोड येथील गुरुकृपा कंपनी, नाशिक या भोजन ठेकेदाराच्या प्रतिनिधीने श्री.रोहीदास जाखेरे या विद्यार्थ्यास इतर वसतीगृहातील विद्यार्थी असल्याच्या गैरसमजूतीमधून मारहाण केल्याचे आढळून आले. प्रकरणी सदर भोजन ठेकेदारास असा प्रकार पुन्हा घडणार नाही याची दक्षता घेण्याबाबत समज देण्यात आली. तसेच सदर घटनेबाबत विद्यार्थ्याने भोजन ठेकेदाराच्या प्रतिनिधीविरुध्द पोलिस ठाण्यात तक्रार केली होती.

वसतीगृहाच्या गृहपालांनी संबंधित विद्यार्थी व भोजन ठेका प्रतिनिधी यांच्याशी चर्चा केली असता, त्यांच्यात सामंजस्य घडून आल्याने विद्यार्थ्याने पोलिस तक्रार मागे घेतली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर येथील आदिवासी मुलींचे वसतिगृह इतरत्र स्थलांतरीत करण्याबाबत**

**(४) १८८३२ (३१-०७-२०१५). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) कॅम्प न.५ येथील गांधी रोड परिसरात सुरु करण्यात आलेल्या वसतिगृहात एकाच कंम्पाउंडमध्ये मुलींचे वसतिगृह आणि त्याच बाजूला महिला सुधारगृह असल्याने या वसतिगृहात शिक्षणासाठी राहत असलेल्या मुलींना मनस्ताप सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे वसतिगृह इतर ठिकाणी स्थलांतरीत करावे अशी मागणी शिक्षक परिषदेचे कार्यवाह यांनी मा.आदिवासी मंत्री यांच्याकडे दिनांक १८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त वसतीगृहात असलेल्या असुविधांकडे लक्ष वेधण्यासाठी वसतीगृहातील मुलींनी शनिवार दिनांक ११ एप्रिल, २०१५ रोजी काळ्या फिती लावून वसतीगृहातील दुरवस्था प्रसारमाध्यमांच्या समोर मांडल्या हे खरे आहे काय,

(४) असल्यास, वसतीगृहातील अधिक्षिका याच केवळ महिला असून इतर कर्मचारी वर्ग पुरुष असल्याने त्यांची अडचण होत आहे, तसेच वसतीगृहात निकृष्ट दर्जाचे जेवण दिले जाणे, सोलर मशीन बंद असणे, शैक्षणिक साहित्य मिळत नाही, वैद्यकीय साहित्य नाही, सफाई कामगार नाही, वैद्यकीय तपासणीसाठी स्वतःच जावे लागणे इत्यादी बाबी निदर्शनास आणल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-०४-२०१७) :** (१) हे खरे नाही.

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह, उल्हासनगर व महिला सुधारगृह या दोन्ही इमारती एकाच कंपाऊंडमध्ये असल्या तरी दोन्ही इमारतींचा एकमेकांशी संबंध नसल्याने वसतीगृहात रहात असलेल्या मुलींना मनस्ताप सहन करावा लागत नव्हता.

(२) व (३) प्रस्तुत मागणीच्या अनुषंगाने माहे जून, २०१६ पासून सदर वसतीगृह दुसऱ्या ठिकाणी सर्व सोयींनी युक्त इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आलेले आहे.

(४) व (५) सदर वसतीगृहासाठी ५ पदे मंजूर असून पाचही पदे भरलेली आहेत. त्यापैकी गृहपाल या पदावर महिला कर्मचारी कार्यरत असून इतर पदांवर पुरुष कर्मचारी कार्यरत आहेत. प्रस्तुत वसतीगृहासाठी लिपिक टंकलेखक पदावर महिला कर्मचारी नियुक्त करण्याबाबत प्रकल्प स्तरावरुन कार्यवाही करण्यात येत अहे.

भोजन ठेकेदारामार्फत वसतीगृहातील विद्यार्थीनींना शासन निर्णयातील तरतूदींप्रमाणे भोजन पुरवठा केला जातो तसेच वसतीगृहातील विद्यार्थीनींना इतर देय साहित्याचे वाटप करण्यात आलेले आहे.

(६) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

---

**कोकणात केमिकल झोन उभारण्याच्या निर्णयाबाबत**

**(५) २८२५१ (३१-१०-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.संजय कदम (दापोली), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुंतवणूक वाढविण्याच्या दृष्टीने इंन्ट्रीग्रेटेड पेट्रोलियम, केमिकल्स ॲण्ड मेट्रोकेमिकल्स इन्व्हेस्टमेंटच्या सहकार्याने कोकणात केमिकल झोन उभारण्याचा निर्णय माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयामुळे कोकणातील शेती नापीक तसेच मच्छिमारीचा व्यवसाय धोक्यात येणार असल्यामुळे झोन उभारण्यास तेथील लोकप्रतिनिधींनी व जनतेने विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१३-०४-२०१७) :** (१) कोकणातील रायगड जिल्हयात नव्याने केमिकल झोन उभारण्यासंदर्भात कोणतेही आदेश निर्गमित करण्यात आलेले नाहीत.

(२) व (३) आम आदमी पार्टी (कोकण) व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी या पक्षाकडून निवेदने प्राप्त झाली आहेत. तसेच श्री.कुलदीप शशिकांत मंगळे यांनी दिनांक ३१ ऑगस्ट २०१५ रोजी ई-मेलद्वारे मुख्यमंत्री कार्यालयास निवेदन सादर केले आहे. या व्यतिरिक्त कोकण विभागातील कुठल्याही जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयात लोकप्रतिनिधीद्वारे तसेच जनतेकडून कोणतेही निवेदन या संदर्भात प्राप्त झालेले नाही.

या विषयाबाबत सर्वांगीण विचार करुन उचित निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

---

**औद्योगिक विकासातून राज्यातील स्थानिक लोकांना रोजगार मिळण्याबाबत**

**(६) २९०२८ (२१-०१-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औद्योगिक विकासातून राज्यातील स्थानिक लोकांना जास्तीत जास्त रोजगार मिळावा या दृष्टीकोनातून स्थानिक लोकांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्याचे धोरण शासनाने शासन निर्णय क्र. स्थालोरो-२००८/प्र.क्र.९३/उद्योग-६ दि. १७ नोव्हेबर, २००८ नुसार अवलंबिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चाकण औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांनी सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या कंपन्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-०६-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

चाकण औद्योगिक क्षेत्रातील उद्योग घटकांनी शासन निर्णय दिनांक १७/११/२००८ नुसार स्थानिक रोजगाराचे प्रमाण राखले असल्याचे एमआयडीसी व उद्योग संचालनालय यांनी कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भ‍ावत नाही.

---

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबडेकर समता प्रतिष्ठानची स्थापना करण्याबाबत**

**(७) ३०२०१ (१८-०१-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशन धर्तीवर महाराष्ट्र राज्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबडेकर समता प्रतिष्ठानची स्थापना करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, असल्यास प्रतिष्ठानची रचना व कार्यकक्षा काय आहेत, तसेच त्याचे मुख्यालय कोठे असणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रतिष्ठानची स्थापना करण्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे व सदर निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात आला आहे अथवा येत आहे,

(४) अद्याप, निर्णय घेण्यात आला नसल्यास विचाराधीन असलेल्या प्रस्तावाचे स्वरुप काय आहे व या संदर्भातील निर्णय किती कालावधीत घेणे अपेक्षित आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०४-२०१७) :** (१) होय.

(२), (३) व (४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त केंद्र शासनाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनच्या धर्तीवर महाराष्ट्रात डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठानची स्थापना करण्यासाठीचा निर्णय दि.९/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहेत.

सदरहू प्रतिष्ठानचे मुख्यालय, नागपूर येथे प्रस्तावित असून, त्यासाठी रु.१० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. सदर प्रतिष्ठानचे स्वरुप, रचना व कार्यकक्ष ठरविण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

---

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाच्या आवारातील तरण तलाव वापराविना पडून असल्याबाबत

**(८) ३२२२६ (१८-०१-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड जिल्हा, रायगड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी बांधण्यात आलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाच्या आवारातील तरण तलाव शुभारंभापासून वापराविना पडून असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तरण तलाव वापरात नसण्याची काय कारणे आहेत,

(३) असल्यास, संबंधित तरण तलावाची देखरेख कोण करते,

(४) असल्यास, सदर स्माकर परिसरामध्ये कोणकोणत्या सुविधा उपलब्ध केल्या आहेत व त्या चालु आहेत काय,

(५) असल्यास, सदर सुविधा वापराविना बंद ठेवणाऱ्या प्रशासनावर शासनाने काय कारवाई केली आहे, तसेच, सर्व सुविधाचा वापर सामान्य जनतेसाठी कधीपर्यंत खुली करणार आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०४-२०१७) :** (१) होय.

(२) राष्ट्रीय स्मारक, महाड हे कोकण विभागात असल्याकारणामुळे पावसाळयामध्ये अतिवृष्टी व उन्हाळयामध्ये पाणी टंचाई इत्यादि कारणामुळे तरण तलावाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. तरण तलावाच्या अंतर्गत बांधकामामध्ये ठिकठिकाणी गळती होत आहे. तरण तलावासाठी ग्रामपंचायत लाडवली यांच्याकडील पाणी पुरवठा करण्यासाठी पाईपलाईन करणेत आली होती. परंतु पाईपलाईनमध्ये विविध ठिकाणी गळती असल्याकारणाने पाणीपुरवठा बंद आहे. तसेच तरण तलावाचे पाणी शुध्दीकरण इंजिन/मोटार बंद अवस्थेत आहे. या सर्व कारणांमुळे तरण तलाव सद्य:स्थितीत वापरात नाही.

(३) सदर तरण तलावाची देखरेख व्यवस्थापक, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, महाड यांच्याकडून करण्यात येते.

(४) स्मारक परिसरातील सोयीसुविधा खालीलप्रमाणे आहेत :-

अ) स्मारकातील नाटयगृह बंद अवस्थेत होते ते दुरुस्त करुन सुरु केलेले आहे.

ब) विपश्यना प्रशिक्षण शिबीर सुरु केलेले आहे.

क) IBPS स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण वर्ग सुरु केलेले आहे.

ड) कौशल्य विकास विभाग सुरु करणे प्रस्तावित आहे.

इ) ग्रंथालयामध्ये ई-लायब्ररी सुविधा उपलब्ध केली आहे.

फ) ग्रंथालयामध्ये लहान मुलांसाठी स्वतंत्र बालविभाग कक्ष सुरु केला आहे.

ग) बहुद्देशिय हॉल, सांस्कृतिक, सामाजिक कामांसाठी सुरु केला आहे.

(५) सदर तलावाची देखभाल बार्टी, पुणे अंतर्गत व्यवस्थापक, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, महाड यांचेकडून करण्यात येत असल्याने सद्य:स्थितीत तरण तलाव त्वरीत सुरु करणेसंदर्भात कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भावत नाही.

---

## राज्यातील शेतमाल तारण योजनेत गुळाचा समावेश करण्यात आल्याबाबत

**(९) ३९७३९ (२७-०४-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतमाल तारण योजनेत माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान गुळाचा समावेश करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे,

(२) असल्यास, बाजार समित्यांकडे कोल्ड स्टोरेज उपलब्ध नसल्यामुळे गुळ ३ दिवसात वितळण्यास सुरूवात होत असल्याने कोल्ड स्टोरेज उभारण्यासाठी मदत देण्याची मागणी विविध बाजार समित्यांनी शासनाकडे केली आहे, हे सुध्दा खरे आहे काय,

(३) असल्यास, बाजार समित्यांना या योजनेतून उत्पन्न मिळत नसल्यामुळे या योजनेस म्हणावा तसा प्रतिसाद दिलेला नाही, हे सुध्दा खरे आहे काय,

(४) असल्यास, बाजार समित्यांच्या मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२६-०४-२०१७) :** (१) होय.

मात्र गुळ उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या लक्षात घेऊन, उपाययोजना सुचविण्यासाठी सेवानिवृत्त पणन संचालक यांच्या अध्यक्षतेखाली गुळ शेतमाल तारण कर्ज योजनेबाबत अहवाल व प्रस्ताव सादर करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली होती.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) सेवानिवृत्त पणन संचालक श्री.दिनेश ओऊळकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार कामकाज सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भावत नाही.

---

## यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा,केळापूर व झरीजामनी तालुक्यातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रमाणपत्र मिळत नसल्याबाबत

**(१०) ४६५८२ (२८-०४-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा, केळापूर व झरीजामनी तालुक्यातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी लागणा-या प्रमाणपत्राची विविध कार्यालयात जाऊन मागणी करुन देखील प्रमाणपत्र मिळत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, अनेक विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र काढण्या करीता अनेक प्रस्ताव दाखल करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकाही विद्यार्थ्याला जात प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, लवकर प्रमाणपत्र मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२१-०४-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

जातीचे प्रमाणपत्र देणे व त्याची पडताळणी करणे यासाठी सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३ व त्या अंतर्गत पारितिनयम २०१२ अन्वये कार्यवाही केली जाते. सक्षम अधिकाऱ्यांना विहित कालमर्यादेत जात प्रमाणपत्र देणे सदर नियमानुसार बंधनकारक असल्यामुळे जातप्रमाणपत्र देणेबाबतचा प्रस्ताव आवश्यक ती तपासणी करुन लवकरात लवकर निकाली निघत असल्याने याप्रकरणी विलंब होत नाही.

(३) हे खरे नाही.

माहे जानेवारी, २०१६ पासून यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा, केळापूर व झारीजामनी या तालुक्यात सुमारे ८११२ प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोमटी समाजास सामाजिक आरक्षण मिळणेबाबत

**(११) ५०११४ (२८-०४-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अल्पसंख्यांक म्हणून परिचित असलेले कोमटी समाज परिस्थितीने गरीब व कास्ताकारी समाज म्हणून ओळखला जातो त्या समाजाने शिक्षण व नोकरीत आरक्षण मिळवण्यासाठी शासनाकडे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोमटी समाजास सामाजिक आरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२१-०४-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) याबाबत राज्य मागासवर्ग आयोगाकडून सर्वेक्षण अहवाल मागविण्यात आला असून सदर अहवाल अद्यापि अप्राप्त आहे.

(३) प्रश्न उद्भ्‍ावत नाही.

---

**ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या मोखाडा शाखेत बनावट सोने तारण ठेवून गैरव्यवहार केल्याबाबत**

**(१२) ५४२६२ (२२-०८-२०१६). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अमित घोडा (पालघर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या मोखाडा शाखेत बनावट सोने तारण ठेवून सुमारे १ कोटी १४ लाखांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी शाखेचे व्यवस्थापक यांना माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निलंबित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) तदनुसार शासन स्तरावर दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने दिनांक ३१/३/२०१६ रोजी मुदत संपलेल्या सोन्याचा लिलाव दिनांक २८/४/२०१६ रोजी मोखाडा शाखेत केला असता सदर सोने बनावट असल्याचे निदर्शनास आल्याने मोखाडा जि.पालघर येथील पोलीस स्टेशनमध्ये बँकेने दिनांक २८/४/२०१६ रोजी तत्कालिन बँक शाखा व्यवस्थापक, तत्कालिन शाखा हिशेबनीस तसेच २२ कर्ज प्रकरणाशी संबंधित १७ कर्जदार अशा एकूण २० व्यक्तींवर (यामध्ये तत्कालिन १ बँक सुरक्षारक्षक) एफ.आय.आर.क्र. आय २१/२०१६ नोंदवून गुन्हा दाखल केलेला आहे.

(३) सदर गैरव्यवहार प्रकरणी तत्कालिन बँक शाखा व्यवस्थापक व शाखा हिशोबनीस यांना बँक सेवेतून बडतर्फ करण्याचा निर्णय बँकेच्या संचालक मंडळ सभा दिनांक २९/४/२०१६ मध्ये घेतलेला आहे. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था कोकण विभाग, नवी मुंबई या कार्यालयाकडूनही दिनांक ३०/६/२०१५ व दिनांक १४/७/२०१६ रोजी बँकेस उक्त गैरव्यवहारातील रक्कम वसुली करण्याबाबत तसेच भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नये यासाठी बँकेने केलेल्या उपाययोजनाबाबतचा अहवाल व अपहारीत रक्कमेच्या वसुलीचा प्रकरणनिहाय अहवाल मागविला आहे.

(४) प्रश्न उद्भ्‍ावत नाही.

---

## राज्यात शासनाच्या विविध विभागांतर्गत अपंगाच्या राखीव जागांचा अनुशेष भरून काढण्याबाबत

**(१३) ५४४४६ (२३-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाच्या विविध विभागांतर्गत अपंगासाठी राखीव असलेल्या जागांचा अनुशेष भरून काढण्याबाबत शासनाने मोहीम राबवूनही अद्याप ५०% अनुशेष व २७७६ जागा रिक्त असल्याचे दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त जागा त्वरित भरण्याबाबत व अपंगाचा राखीव अनुशेष दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०४-२०१७) :** (१) व (२) अपंग अधिनियम, १९९५ ची राज्यात सन १९९६ पासून जशीच्या तशी अंमलबजावणी करण्यात येत असून, सदर अधिनियमातील तरतुदीनुसार शासकीय सेवेत अपंगाकरिता एकूण ३ टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. त्यानुसार राज्य शासनामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

या विभागाकडून अपंग अधिनियम, १९९५ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीविषयक केवळ समन्वयाचे कामकाज हाताळण्यात येते. मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल असलेल्या रिट याचिका क्र.३२९४/२०१०-निलिमा अनंत सुर्वे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने शासन सेवेतील अपंगांचा अनुशेषबाबत मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभागांकडून (डिसेंबर-२०१० पर्यंतची) माहिती संकलीत करुन मा.उच्च न्यायालयास सादर करण्यात आली व त्यानंतरही सदर माहिती संकलीत करुन वेळोवेळी मा.उच्च न्यायालयात सादर करण्यात येत आहे. त्यानुसार दि.३०-१२-२०१५ पर्यंतची विविध प्रशासकीय विभागांकडून उपलब्ध माहितीनुसार राज्य शासनाच्या विविध प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयांमध्ये अंदाजे २५७३ पदांचा अनुशेष शिल्लक असल्याचे दिसून आले.

अपंगांचा अनुशेष भरुन काढणेसाठी यापूर्वी विशेष भरती मोहिम राबविणेबाबत दि.८.८.२०११ रोजी शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे. सदर शासन परिपत्रकातील सूचना दिनांक २३.७.२०१५ च्या अर्ध शासकीय पत्रान्वये पुनश्च: सर्व विभागांना सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन सेवेतील अपंगांच्या अनुशेषाची पदे तातडीने भरण्यासंदर्भात प्रधान सचिव (सा.न्या.) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ३०.१२.२०१५ रोजी मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभागांची बैठक आयोजित करण्यात येऊन विशेष भरती मोहिम राबवून अपंगांचा अनुशेष तातडीने भरण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

त्याचप्रमाणे दि.३०.१२.२०१६ व ४.०१.२०१७ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये अपंगांचा अनुशेष तातडीने भरण्याबाबत सुचित करण्यात आले असून अपंगांच्या रिक्त पदाची अद्यावत माहिती पाठविण्याबाबत सर्व विभागांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अण्णाभाऊ साठे महामंडळातील ५५ कोटी कर्ज वितरण गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत**

**(१४) ५५०३९ (२०-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अण्णाभाऊ साठे महामंडळातील ५५ कोटी कर्ज वितरण घोटाळयाची शासनातर्फे सुरु असलेली सीआयडी चौकशीची कार्यवाही पुर्ण करण्यात आली आहे काय,
(२) असल्यास, सदरहू चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार दोषी राजकारणी, अधिकारी, कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली आहे व त्यांची नावे काय आहेत,
(३) तसेच, याबाबत शासन तथा पोलीसांनी आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(४) अद्याप, सीआयडी चौकशीची कार्यवाही पुर्ण नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व किती निश्चित कालावधीत कार्यवाही पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-०२-२०१७) :** (१) चौकशीची कार्यवाही अद्याप सुरु आहे.
(२) व (३) राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या तपासामध्ये महामंडळाचे दोषी आढळलेले तत्कालीन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक असे मिळून एकूण १८ अधिकारी/कर्मचा-यांवर स्थानिक पोलिस स्टेशनमध्ये फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल केले असून त्यापैकी ८ अधिकारी/कर्मचा-यांची पुढील तपासासाठी न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. तसेच, या गुन्ह्यासंबंधीत ३ अधिकारी/कर्मचाऱ्यांना मा.न्यायालयाकडून जामीन मंजूर झाला असून या प्रकरणी एकूण २१ अधिकारी/कर्मचा-यांना निलंबित केले आहे.
(४) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळात झालेल्या गैरव्यवहार प्रकणांचा तपास त्वरेने पूर्ण करण्याबाबत गृह विभागाकडून त्यांच्या दि.१५.०७.२०१६ च्या पत्रान्वये राज्य गुन्हे अन्वेषण शाखा, महाराष्ट्र राज्य यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

---

**राज्य शासनाने शेतक-यांच्या थकीत पीककर्जाची माहिती मागविली असल्याबाबत**

**(१५) ५५९४० (२२-०८-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने शेतक-यांचे पीककर्ज माफ करण्याबाबत जिल्हा बँका व राष्ट्रीयकृत बँकाकडून सन २००९-२०१० पासून शेतक-यांच्या थकीत कर्जाची माहिती मागविली असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनाकडून सदरील माहिती संकलित करण्यात आली काय,
(३) असल्यास, संकलित केलेल्या माहितीनुसार राज्य शासनाकडून टंचाईग्रस्त भागातील शेतक-यांना पीककर्ज माफी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१७) :** (१) नाही. पीककर्ज माफ करण्यासाठी थकीत कर्जाची माहिती मागविल्याचे खरे नाही. तथापि, थकीत कर्जाचे पुनर्गठन करण्याच्या हेतूने भारतीय रिझार्व्ह बँकेची पूर्व परवानगी घेण्यासाठी व त्या अनुषंगाने प्रस्ताव तयार करण्यासाठी निश्चित थकबाकीची माहिती मागविण्यात आली आहे.

(२) नाही. सदर माहितीचे अंशतः संकलन झाले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कर्जत तालुक्यातील (जि. रायगड) शेतकऱ्यांची रिलायन्स गॅस कंपनीकडून झालेली फसवणूक**

**(१६) ५६१५८ (१९-०८-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिलायन्स गॅस कंपनीने कर्जत तालुक्यातील (जि. रायगड) ज्या गावांमधील शेतकऱ्यांच्या शेतीच्या जागेमधून पाईपलाईन गेली त्या जागेचा संबंधित शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला न देता शेतकऱ्यांची फसवणूक करुन पाईप लाईन गेलेल्या जमिनीच्या ७/१२ (इतर हक्कात) रिलायन्स कंपनीचा शिक्का पडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिलायन्स गॅस कंपनीने शेतकऱ्यांची फसवणूक केल्याप्रकरणी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी रायगड तसचे शासनाकडे याबाबत माहे मार्च-एप्रिल २०१६ च्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०९-०५-२०१७) :** (१) मे. रिलायन्स गॅस ट्रान्सपोर्टेशन इन्फ्रा. लि. गॅस पाईपलाईन अशी नोंद इतर हक्कात घेण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) केंद्र शासनाच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस मंत्रालय यांच्या पेट्रोलियम आणि मिनरल्स पाईपलाईन अधिनियम १९६२ अन्वये दि.७/४/२०१५ रोजीच्या अधिसूचना नुसार गुजरात मधील दहेज ते महाराष्ट्रातील नागोठणे, जि.रायगड पर्यंत इथेन गॅस पाईपलाईन प्रकल्प रिलायन्स पाईपलाईन्स लि. मार्फत राबविण्यात येत आहे. यामध्ये कर्जत तालुक्यातील २१ महसूली गावातील एकूण ६७९ सर्व्हे नंबरच्या जमिनी मालकाच्या/वहिवाटीतून गॅस पाईपलाईन टाकण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. बाधित शेतकऱ्यांसोबत वाटाघाटीने नुकसान भरपाईचा दर ठरविण्याची

कार्यवाही भूसंपादन अधिकारी यांच्या स्तरावर सुरु आहे. सदर पाईपलाईन टाकण्याचे काम शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करुन करण्यात येत आहे. सदर पाईपलाईनच्या देखभाल दुरुस्तीकरीता बाधित क्षेत्राच्या महसूली अभिलेखात मे.रिलायन्स गॅस ट्रान्सपोर्टेशन इन्फ्रा लि.गॅस पाईपलाईन अशी नोंद इतर हक्कात घेण्यात आली आहे.

---

## कोल्हापूर शहर व जिल्ह्यातील अपंग व्यक्तींना व्यवसायासाठी कर्जपुरवठा मंजूर करण्याकरिता जाचक अटी घालण्यात आल्याबाबत

**(१७) ५७०४४ (२०-०८-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य अपंग वित्त व आर्थिक विकास महामंडळामध्ये अपंग व्यक्तींना व्यवसायासाठी कर्ज पूरवठा करण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर शहर व जिल्ह्यातील अपंग व्यक्तींना व्यवसायासाठी कर्जपूरवठा मंजूर करण्याकरिता जाचक अटी घालण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे अपंगाना कर्ज मिळण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोल्हापूर शहर व जिल्हा अपंग कृती समितीच्या वतीने शासनाला याबाबतचे निवेदन माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-०२-२०१७) :** (१) होय.

(२) नाही.

(३) नाही.

(४) व (५) कोल्हापूर शहर व जिल्हा अपंग पुनर्वसन कृती समितीचे निवेदन महामंडळास प्राप्त झाले असून सदर निवेदनात उपस्थित केलेल्या मुद्यांपैकी काही धोरणात्मक बाबींवर कायदेशीर व तांत्रिक बाबी तपासून सुधारणा करण्याची कार्यवाही महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळामार्फत करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहातील मुले दूषित पाण्यामुळे आजारी पडत असल्याबाबत

**(१८) ५७१०७ (२०-०८-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहातील मुले दूषित पाण्यामुळे आजारी पडल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मे महिन्यात अभियांत्रिकी, विधी आणि व्यवसायिक अभ्यासक्रमांची परिक्षा सुरु असल्याने या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या वसतिगृहाला दूषित पाणी पुरविण्यात येत असल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-०५-२०१७) :** (१) नाही.
(२) नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद शहरातील बंजारा कॉलनी येथील विद्यार्थी वसतीगृहास देण्यात येणाऱ्या अनुदानात आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१९) ५७६०५ (२०-०८-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरातील बंजारा कॉलनी येथील विद्यार्थी वसतीगृहास औरंगाबाद जिल्हापरिषदेच्या समाज कल्याण विभागाकडून देण्यात येणाऱ्या दरवर्षीच्या अनुदानात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसतीगृहाच्या व्यवस्थापनाविरुध्द आतापर्यंत काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-०५-२०१७) :** (१) नाही.
(२) बंजारा विद्यार्थी वसतिगृह, बंजारा कॉलनी, औरंगाबाद या वसतिगृहास सन २०१३-१४ मध्ये अनुदान देण्यात आलेले आहे. परंतु, सदर संस्थेच्या वादामुळे अनुदान वसतिगृहाच्या खात्यावरच पडून आहे. तसेच, सन २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये सदर वसतिगृहाने अनुदान मागणी प्रस्तावच समाजकल्याण विभागास सादर केला नसल्याचे जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.प. औरंगाबाद यांनी कळविले आहे. सबब, आर्थिक गैरव्यवहाराच्या कारणस्तव कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्थेला (बार्टी)**
**पूर्णवेळ महासंचालक नसल्याबाबत**

**(२०) ५७६८५ (२०-०८-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांची अंमलबजावणीची जबाबदारी असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्थेला (बार्टी) गेल्या अडीच महिन्यापासून पूर्णवेळ महासंचालकच नसल्यामुळे संस्थेमार्फत राबविल्या जाणाऱ्या अनेक उपक्रमांचे कामकाज रखडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जंयती निमित्त राज्य सरकारने हाती घेतलेल्या योजना जात प्रमाणपत्रांची पडताळणी, अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण अशा सर्व योजनांना बार्टीवर भार असल्याने त्या योजना तातडीने राबविण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०४-२०१७) :** (१) नाही. शासन आदेश दि.२१ एप्रिल, २०१६ अन्वये महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्था (बार्टी), पुणे या पदावर श्री.राजेश ढाबरे (IRS २०००) यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील जेष्ठ नागरीकांचे अनुदान एक हजार रुपये करणेबाबत**

**(२१) ५८०१५ (२०-०८-२०१६). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जेष्ठ नागरीकांचे अनुदान ४०० रुपयाहून एक हजार रुपये करावे यासाठी जेष्ठ नागरीक संयुक्त कृती समिती राज्यभर धरणे आंदोलन करणार असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जेष्ठ नागरीकांचे सदर अनदान एक हजार करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०५-०४-२०१७) :** (१) नाही.

(२) विशेष सहाय्य कार्यक्रमाअंतर्गत असलेल्या योजनातील लाभार्थ्यांच्या मासिक अनुदानात वाढ करण्याच्या प्रस्तावावर विचारविनिमय सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूकीत लागणा-या मतपत्रिकांसह इतर छपाईची कामे सरकारी प्रेसमध्ये न करता खाजगी प्रेसमधून करण्याबाबत

**(२२) ५८३८४ (२२-०८-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूकीत लागणा-या मतपत्रिकांसह इतर छपाईची कामे सरकारी प्रेसमध्ये न करता खाजगी प्रेसमधून छपाई करुन घेण्यात आल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे संबधित संस्थेला जादा खर्चाचा भूर्दंड सहन करावा लागला आहे, हेही खरे आहे काय,

(३) तसेच शासनाचा कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडाला, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१८-०४-२०१७) :** (१) होय.

(२) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत घेण्यात येणाऱ्या सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूकांचा खर्च नियंत्रित ठेवण्यासाठी दि.१६/११/२००६ च्या आदेशान्वये मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या असून, मतपत्रिकांच्या छपाईबाबत खर्चाची मर्यादा नमूद केली आहे. उक्त आदेशात नमूद खर्चाच्या मर्यादेमध्ये मतपत्रिकांची छपाई करण्यात येते. त्यामुळे संस्थेला जादा खर्चाचा भुर्दंड सहन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) सहकारी संस्थांच्या निवडणुकीची खर्च संबंधित सहकारी संस्था रेखांकित धनादेशाव्दारे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नावे बँकेत भरणा करीता असल्याने, शासनाचा कोटयावधी रुपयाचा महसूल बुडण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मराठा व मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याबाबत

**(२३) ५९२२१ (२०-०८-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठा व मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याबाबत सातत्याने मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही समाजास आरक्षण देणेबाबत निर्णय घेण्यास विलंब होत असल्याने राज्यात संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दोन्ही समाजास आरक्षण देणेबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-०३-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) मराठा समाजास शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग तयार करुन त्या प्रवर्गातील १६ टक्के आरक्षण देण्याकरिता दि.९/७/२०१४ रोजी सन २०१४ चा महाराष्ट्र शासन अध्यादेश क्र.१३ काढण्यात आला व दि.१५/७/२०१४ च्या शासन निर्णयान्वये मराठा समाजास शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग तयार करुन १६ टक्के आरक्षण देण्यात आले. दि.१४/११/२०१४ रोजी सदर अध्यादेशास व शासन निर्णयास मा.उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली. मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशात हस्तक्षेप करण्यास नकार दिल्यामुळे याबाबतचे प्रकरण मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

तसेच मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याकरीता दि.९/७/२०१४ रोजी सन २०१४ चा महाराष्ट्र शासन अध्यादेश क्र.१४ काढण्यात आला व दि.१९/७/२०१४ च्या शासन निर्णयान्वये मुस्लिम समाजाकरिता विशेष मागास प्रवर्ग-अ तयार करुन ५ टक्के आरक्षण देण्यात आले. मा.उच्च न्यायालयाने सदर अध्यादेशास स्थगिती दिल्यामुळे मुस्लिम समाजास आरक्षण देण्याबाबतचे प्रकरण मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लिंगायत समाजातील १२ पोटजातींना ओबीसी आरक्षण मिळणेबाबत**

**(२४) ६१२२३ (२०-०८-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लिंगायत समाजातील यापूर्वी १४ पोटजातींना ओबीसी आरक्षण देऊन उर्वरित वीरशैव लिंगायत, लिंगायत , लिंगायत रेड्डी, लिंगायत कानोडी, लिंगडेर / लिंगधर, लिंगायत शिलवंत, लिंगायत दिक्षावंत, लिंगायत पंचम, लिंगायत चतुर्थ, हिंदू लिंगायत, हिंदू वीरशैव, लिगायत तिराळी या पोट जातींना अद्याप ओबीसी आरक्षणापासून वंचित ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित पोटजातींना ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करण्याबाबत राज्यशासनाने सकारात्मक अवहाल राज्य मागासवर्गीय आयोगाकडे पाठवला आहे तो अहवाल शासनाकडे प्राप्ता झाला आहे काय,
(३) असल्यास, वरील १२ जातींना राज्य शासन इतर मागासवर्गीय समाजात सवलती बहाल करणार आहे काय, असल्यास शासनाची यावर प्रतिक्रिया काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२१-०४-२०१७) :** (१) हे खरे नाही.

या विभागाच्या दि.४/९/२०१४ च्या शासन निर्णयान्वये लिंगायत समाजातील १४ पोटजातींना आरक्षण देण्यात आले असून उर्वरित जातींना आरक्षण देण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

(२) व (३) सदर अहवाल अद्यापी अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### क्रांतिवीर लहुजी साळवे मातंग अभ्यास आयोगाच्या अहवालाच्या अंमलबजावणीबाबत

**(२५) ६१६३८ (२०-०८-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्रांतिवीर लहुजी साळवे मातंग अभ्यास आयोगाच्या शासनाने स्वीकारलेल्या ६४ मागण्यांच्या अंमलबजावणीसाठी शासनामार्फत कृती अहवाल तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कृती अहवालाचे स्वरुप काय आहे व त्यातील बाबींची अंमलबजावणी केली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (२१-०४-२०१७) :** (१) या विभागाच्या दि.३१/१२/२०११ च्या शासन निर्णयान्वये मान्य करण्यात आलेल्या कांतिवीर लहुजी साळवे मातंग अभ्यास आयोगाच्या शिफारशींबाबत शासनाच्या विविध विभागांकडून अंमलबजावणी करण्यात येत असून त्याबाबत आढावा घेण्यासाठी मा.राज्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली वेळोवेळी बैठका आयोजित करण्याचे शासन आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### जालना जिल्हयातील सुमारे १५० अपंगांचे कर्ज प्रस्ताव मंजूरी न मिळाल्याने प्रलंबीत असल्याबाबत

**(२६) ६१६७२ (२०-०८-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील सुमारे १५० अपंगांचे कर्ज प्रस्ताव मंजूरी न मिळाल्याने प्रलंबीत असल्याचे दिनांक १२ मे २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्तप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय व सदरहू अपंगांचे प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-०२-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळाच्या जालना जिल्हा कार्यालयामार्फत प्राप्त कर्ज प्रस्तावांबाबत चौकशी करण्यात आलेली असून प्राप्त प्रस्तावातील आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करण्यासंदर्भात अर्जदाराशी पत्रव्यवहार करण्यात येत आहे. तसेच परिपुर्ण कर्ज प्रस्तावांस मंजूरी देण्यासंदर्भात, जिल्हा व्यवस्थापक, जालना जिल्हा कार्यालय यांचे मार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील शेतक-यांच्या कर्जाचे पुनर्गठन तसेच त्यांच्याकडील**
**पीक कर्जाच्या वसुलीस स्थगितीबाबत**

**(२७) ६२१५७ (२२-०८-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार नंतर समावेश करण्यात आलेल्या विदर्भातील ११ हजार ८६२ गावातील शेतक-यांच्या कर्जाचे पुनर्गठन तसेच त्यांच्याकडील पीक कर्जाच्या वसुलीस स्थगिती न दिल्यामुळे विदर्भातील काही बँकांना दुष्काळी परिस्थितीतही सक्तीची वसूली चालू ठेवल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, कर्जाचे पुनर्गठन तसेच पीक कर्जाची वसुली स्थगिती देण्याबाबतचे आदेश केव्हा देण्यात आले ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.

अमरावती व नागपूर विभागातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील पीक कर्जाची शेतक-यांकडून सक्तीने वसूली केलेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकरिता पदनिर्मिती करण्याबाबत**

**(२८) ६२३६४ (२०-०८-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकरिता पदनिर्मिती करण्याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १ जून, २०१६ च्या शासन निर्णयामुळे कनिष्ठ लिपिक, शिपाई, पोलीस निरिक्षक, प्रमुख लिपिक, वाहनचालक इत्यादी पदे कमी करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागासवर्गीय कल्याण्याच्या वाढत्या योजना लक्षात घेता उपलब्ध कर्मचाऱ्यांची संख्या इतर प्रशासकीय विभागाशी तुलना केली असता अत्यंत कमी असल्याने कर्मचाऱ्यांवर कामाचा व्याप वाढणार असून, मागासवर्गीय दाखले मिळणे इत्यादी कामास विलंब होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक १ जून, २०१६ चा शासन निर्णय रद्द करुन जिल्हास्तरीय जात पडताळणी समितीसाठी कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-०५-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे. दिनांक १ जून, २०१६ च्या शासन निर्णयान्वये ७६ पदे निरसीत करुन ११५ पदे नव्याने निर्माण करण्यात आलेली आहेत.
(२) १५ विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या निरसीत करुन ३६ जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या स्थापन करण्यात आल्यामुळे सदर समित्यांची संख्या वाढली असून त्यांचे कार्यक्षेत्र कमी होणार असल्यामुळे प्रत्यक्षात कामाचा व्याप कमी होणार आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जातपडताळणीची हजारो प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(२९) ६२८४४ (२०-०८-२०१६). श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विविध जातीची जातपडताळणीची ४८ हजार प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदरची जात प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी कोणत्या उपाययोजना शासन करणार आहे,
(३) नसल्यास याबाबतची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२१-०४-२०१७) :** (१) हे खरे नाही.
माहे ऑगस्ट, २०१६ अखेर राज्यात जातपडताळणीची एकूण ४६७९९ इतकी प्रकरणे प्रलंबित आहेत. जाती दाव्यांच्या काही प्रस्तावांमध्ये कागदपत्रांची कमतरता. अपुरे पुरावे यामुळे संबंधीत व्यक्तीकडून पत्रव्यवहार करुन आवश्यक ते पुरावे मागवावे लागतात. शंकास्पद प्रकरणामध्ये पोलीस दक्षता पथकाकडून चौकशी केली जाते. त्यामुळे प्रकरणे निकाली काढण्यास उशीर होतो.
(२) प्रलंबित प्रकरणांची संख्या व अपुरा कर्मचारीवर्ग यांचा समन्वय साधून तसेच अतिरिक्त कार्यभार देऊन व वेळोवेळी विशेष मोहिमा आयोजित करुन प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची कार्यवाही युध्दपातळीवर करण्यात येत आहे.

राज्यात १५ विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या कार्यरत होत्या. या जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांचा कामाचा व्याप विचारात घेऊन समित्यांचे कामकाज प्रभावीपणे व्हावे, याकरीता दि.२/३/२०१५ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र समिती कार्यान्वित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्णबधीर विकास विद्यालय, किन्हवली (ता.शहापूर, जि.ठाणे) यांना १० आदिवासी अपंग विद्यार्थ्यांना अनुदान तत्वावर मान्यता व वाढीव विद्यार्थी संख्यावाढ मिळणेबाबत**

**(३०) ६२९८७ (२०-०८-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्णबधीर विकास विद्यालय, किन्हवली, ता.शहापूर या शाळेला २००४ सालीपासून ४० निवासी विद्यार्थ्यांना अनुदान मिळाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १८ ऑगस्ट, २००४ च्या शासन निर्णयानुसार या शाळेतील १६ कर्मचाऱ्यांना मंजूरी मिळाली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तेंव्हापासून आजपर्यंत या शाळेतील ८ कर्मचारी अनुदानापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या शाळेने २ ऑगस्ट, २००६ या वर्षी १० वाढीव विद्यार्थ्यांना विनाअनुदान तत्वावर मान्यता घेऊनही अनुदान शाळेला प्राप्त झाले नाही हे खरे आहे काय,
(५) असल्यास, अनुदान मिळणेस विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०६-०२-२०१७) :** (१) होय.
(२) होय.
(३) नाही. सदर संस्थेस आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी त्यांच्या दिनांक ११.३.१९९९ अन्वये ४० निवासी अनुदानीत व १० निवासी कायम स्वरूपी विनाअनुदानीत असे ५० निवासी संख्येवर नोंदणी प्रमाणपत्र क्र.०३२९ दिलेले आहे. तसेच ४० निवासी अनुदानीत विद्यार्थी संख्येवर १६ पदे मंजूर आहेत.
(४) सदर संस्थेत ४० निवासी अनुदानीत विद्यार्थी संख्येवर अनुदान देय आहे. तसेच १० निवासी कायम स्वरूपी विनाअनुदान तत्वावर असलेल्या विद्यार्थी संख्येस अनुदान देण्याबाबत शासनाचे सद्यःस्थितीत धोरण नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी येथे आर्थिकदृष्टया मागासलेल्या मुलीच्या वसतिगृहामध्ये सोयी सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(३१) ६३८८३ (२०-०८-२०१६). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी येथे आर्थिकदृष्टया मागासलेल्या मुलींच्या वसतिगृहामध्ये विद्यार्थिनींना आंघोळीसाठी गरम पाणी न मिळणे, स्नानगृहाचे दरवाजे नसणे, लाईट गेल्यास पर्यायी दिवा-बत्तीची सोय नसणे, वसतिगृहात १२ वी ते पदवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या ८० मुलींची प्रवेश क्षमता असतानाही त्यापेक्षा प्रवेश क्षमता कमी असणे, हजेरी पटावर २३ मुलींची नावे असतानाही त्यापेक्षा प्रत्यक्षात मुलीची संख्या कमी असणे इ. स्वरुपाच्या त्रुटी निदर्शनास आल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार शासनाने काय कार्यवाही केली वा करत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-०५-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) वसतगिृहात प्रवेशति वद्यिार्थीनींना आवश्यक त्या सोयीसुवधिा वेळोवेळी पुरविण्याबाबत सूचना सदर वसतिगृहाच्या गृहपालांना देण्यात आल्या आहेत. वसतिगृहातील स्नानगृहे, स्वच्छतागृहे यांचे दरवाजे दुरुस्त करण्यात येऊन त्याठिकाणी पुरेशा विजेची सोय करण्यात आली आहे. तसेच, वसतिगृहात लाईट गेल्यास दिवा-बत्तीची सोय म्हणून इन्वर्टर व दोन युपीएस संचाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

तसेच, आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी सोलर वॉटर हीटरबाबत क्षेत्रीय कार्यालयांकडून व्यवहार्यता अहवाल मागविलेला असून सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर विहीत पध्दतीचा वापर करुन खरेदी प्रक्रिया राबविण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

---

**सहकारी बँका व पतसंस्थांमध्ये सुरक्षारक्षक नेमणेबाबत**

**(३२) ६३९५१ (२२-०८-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील त्रिमूर्ती चौक, पाटीलनगर येथील नामको बँकेच्या शाखेत दरोड्याचा प्रयत्न फसला असल्याने शहरातील प्रामुख्याने अनेक सहकारी बँका व पतसंस्थांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुढे आला असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही सहकारी बँका व पतसंस्थांमध्ये आवश्यक असतानाही सुरक्षारक्षकच नसल्याने कर्मचाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बँकांच्या व्यवस्थापन व संचालक मंडळाला सदर सहकारी बँका व पतसंस्था यांनी सुरक्षारक्षक नेमावेत यासाठी सक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०६-०२-२०१७) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

दि नाशिक मर्चट्स को ऑप बँक लि.नाशिक या बँकेचया त्रिमूर्ती चौकातील उंटवाडी शाखेमध्ये दिनांक १०.६.२०१६ रोजी चोरी करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. परंतू सदर प्रयत्न फसलेला आहे.

वरील घटना वगळता नाशिक जिल्ह्यात अशा प्रकारची घटना वगळता कुठेही पडल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) सुरक्षिततेच्या दृष्टीने दिवसा व रात्री शस्त्रधारी रखवालदार ठेवणे, सिक्युरिटी अलार्म व सी.सी.टि.व्ही. बसविण्याची कार्यवाही करणेबाबत जिल्ह्यातील सर्व नागरी बँका यांना जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नाशिक यांनी त्यांच्या दिनांक ११.५.२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

तसेच उपरोक्त सूचनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचना सर्व नागरी बँका पतसंस्था यांना देण्याबाबत सर्व उप सहारूयक निबंधक, सहकारी संस्था यांना जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नाशिक यांनी दिनांक ८.६.२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील बियाणे कंपन्यांनी सन १९९५ पासून बियाण्यांवरील शासनाचा कर भरणा न केल्याबाबत**

**(३३) ६४७८० (१९-०८-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बियाणे कंपन्यांनी शासनाचे दिनांक ३१/०५/१९९५ व दिनांक ०४/०४/१९९५ च्या परिपत्रकाचा आधार घेवून शासनाच्या महसूल कराचा भरणा केलेला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे परिपत्रक शासनाकडे उपलब्ध नसल्याचे माहे जून २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बियाणे कपंन्यांची सन १९९५ पासून महसुल कर भरणा केला नसल्यामुळे सदर महसुल कर वसुल करण्यासाठी शासनाच्या वतीने काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०६-०२-२०१७) :** (१), (२), (३) व (४) बियाणे मुळत: शेतमाल जरी असला तरी तो बाजार फीस पात्र नाही अशी दि.३१.०५.१९९५ च्या शासन परिपत्रकात तरतूद असल्यामुळे बाजार फी आकारण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दहेज-नागोठणे,कर्जत, पेण व खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील रिलायन्स कंपनीकडून टाकण्यात येत असलेल्या गॅस पाईपलाईनबाबत

**(३४) ६६०४१ (१६-१२-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहेज-नागोठणे, कर्जत, पेण व खालापूर (जि.रायगड) तालुक्यामध्ये गॅसपाईप लाईन टाकण्यासाठी रिलायन्स कंपनीकडून स्थानिक शेतक-यांच्या जमिनी विनापरवाना, विनासंमती व बेकायदेशीर संपादित केल्या जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या जमिनी रिलायन्स कंपनीने ताब्यात (संपादित) घेतल्यावर जमिनीच्या दोन्ही बाजूच्या सुमारे १५ फुटांपर्यंत कोणतेच बांधकाम करता येणार नसल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार असल्याने शेतक-यांचा प्रखर विरोध होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिलायन्स कंपनीने अद्यापही आपला प्रकल्प अहवाल दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासन काय कारवाई करणार आहे,

(५) तसेच शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०९-०५-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) केंद्र शासनाच्या पेट्रोलियम आणि मिनरल्स पाईपलाईन अधिनियम, १९६२ नुसार खाजगी जमिनीचे संपादन करण्यात येत असल्याने १८ मीटर रुंदीच्या सिमांकन पट्टयात १ मीटर खोल जमिनीत गॅस पाईपलाईन टाकण्यात येत आहे. या संपादित करण्यात येत असलेल्या क्षेत्राची आगाऊ नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. बाधीत शेतकऱ्यांच्या तक्रारीबाबत पालकमंत्री (रायगड) व जिल्हाधिकारी, रायगड यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात येऊन सभेत प्रकल्पाचे प्रयोजन व सुरक्षिततेच्या दृष्टीने घेतलेली खबरदारी शेतकऱ्यांसमोर विदीत करण्यात आली आहे. तसेच गॅस पाईपलाईनच्या मुल्यांकनाबाबत सचिव (वने) व जिल्हाधिकारी रायगड यांची समिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला असून समितीची पुढील कार्यवाही सुरु आहे. या गॅस पाईपलाईनला इजा होऊ नये म्हणून, सिमांकनाच्या जमिनींच्या क्षेत्रात १८ मीटर रुंदीच्या पट्टयात बांधकामास निर्बंध लागू आहेत. पाईपलाईन टाकून झाल्यावर जमीन पूर्ववत करण्यात येत असून सदर क्षेत्रात शेतकरी शेती करु शकतात. तसेच त्यांना रस्ता, बाग, क्रिडांगण व वाहनतळ यासारखे कमी खोलीचे बांधकाम करता येईल व मालकी हक्क मूळ मालकाकडेच राहिल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याचा प्रश्न उद्‌भ‌‌ावत नाही.

---

**मेहकर येथील (जि. बुलढाणा) पंचायत समितीच्या दुर्लक्षामुळे रमाई घरकुल योजना प्रलंबित असल्याबाबत**

**(३५) ६६५९५ (१०-०१-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर येथील (जि. बुलढाणा) पंचायत समितीच्या दुर्लक्षामुळे गेल्या दोन वर्षापासून रमाई घरकुल योजना प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे ग्रामीण भागातील शेकडो मागासवर्गीयांची घरे अपूर्णावस्थेमध्ये आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, चौकशीनुसार पुढे काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०६-२०१७) :**(१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भ‍ावत नाही.

---

**मुंबई-बंगळूर इंडस्ट्रियल कॉरिडॉरमध्ये कोल्हापूरचा समावेश करण्याबाबत**

**(३६) ६६६७७ (१६-१२-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-बंगळूर इंडस्ट्रियल कॉरिडॉरमध्ये कोल्हापूरचा समावेश करण्यात आला आहे काय,

(२) असल्यास, या कॉरिडॉरकरिता किती जागेची आवश्यकता असून सदरची जागा संपादित करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास त्यांची कारणे काय आहेत व किती कालावधीत उक्त जागा संपादित करणे अपेक्षित आहे ?

**श्री. सुभाष देसाई (१३-०४-२०१७) :** (१) मुंबई-बंगळूर इंडस्ट्रीयल कॉरिडॉर सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासन स्तरावर विचाराधीन आहे. प्रस्तावाबाबत विविध विकल्पाचा अभ्यास सुरु असून प्रस्ताव प्राथमिक स्तरावर आहे.

(२) व (३) केंद्र शासनाने तसेच DMICDC या केंद्र सरकारच्या महामंडळाने M/s.Egis India consulting Enginessre Pvt.Ltd.Bangalore या सल्लागार कंपनीस जागेच्या निवडी संदर्भात प्रस्ताव देणेसाठी नियुक्त केले असून या सल्लागार कंपनीने पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर जिल्हयातील जागेबाबत अहवाल सादर केला आहे. याबाबत अद्याप निर्णय झालेला नसून डी.एम.आय.डी.सी. मार्फत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

**अहमदनगर जिल्हयातील दलित वस्ती सुधार योजनेत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी ७९ कोटींचा निधी उपलब्ध झाला असल्याबाबत**

**(३७) ६६७९७ (१०-०१-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील दलित वस्ती सुधार योजनेत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी ७९ कोटींचा निधी उपलब्ध झाला असून माहे सप्टेंबर, २०१६ अखेर पर्यंत सुमारे ९० कोटींच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येणार असल्याचे जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी दिनांक ४ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास माहिती दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दलित वस्ती सुधार योजनेतील अपूर्ण राहिलेल्या कामांसाठी २० कोटी खर्च करुन सदरहू कामे तात्काळ पूर्ण करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू योजनेची सद्य:स्थिती काय आहे व अपूर्ण असलेली कामे किती कालावधीत पूर्ण करण्यात येतील ?

**श्री. राजकुमार बडोले (१७-०४-२०१७) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सन २०१६-१७ या वर्षासाठी रुपये ७८८०.५३ लक्ष एवढा निधी मंजूर आहे. यापूर्वीची देयता वजा जाता रुपये ५८५५.०० लक्ष एवढ्या निधीच्या कामांना सन २०१६-१७ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) सदर योजनेअंतर्गत मंजूर कामांच्या निधी वाटपास प्रशासकीय मंजूरी मिळाल्यानंतर निधी वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल, अपूर्ण कामे प्राधान्याने पूर्ण करुन घेण्यासाठी संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

**राज्यात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याचा (ॲट्रॉसिटी) गैरवापर रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(३८) ६७००९ (१०-०१-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याचा (ॲट्रॉसिटी) गैरवापर रोखण्यासाठी उपाययोजना करण्याचा शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ॲट्रॉसिटी कायद्याचा होत असलेला गैरवापर रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत विचाराधीन असलेल्या प्रश्नाबाबत शासनाने निर्णय घेऊन त्यानुसार त्यांची अंमलबजावणी करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२१-०४-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‍भ्‍ावत नाही.
(३) प्रश्न उद्‍भ्‍ावत नाही.

---

**कन्यादान अनुदान योजनेत दुपटीने वाढ करण्यात आल्याबाबत**

**(३९) ६७४४१ (१०-०१-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामुदायिक विवाह सोहळ्यात विवाह करणाऱ्या मागासवर्गीय जोडप्यांसाठी राज्य सरकारकडून देण्यात येणाऱ्या कन्यादान अनुदान योजनेत दुपटीने वाढ करण्यात आली असल्याचे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास विवाह सोहळे आयोजित करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेसाठी देण्यात येणाऱ्या दोन हजार रूपये अनुदानातही वाढ करून ते चार हजार रूपये करण्यात आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२१-०४-२०१७) :** (१) होय.
(२) होय.
(३) सामुहिक विवाह सोहळ्यामध्ये भाग घेऊन विवाह करणाऱ्या मागासवर्गीय दांमत्यांसाठी असलेल्या कन्यादान योजनेत बदल अनुदानात वाढ दि.१५/१०/२०१६ पासून लागू करण्यात आली आहे.
(४) प्रश्नच उद्‍भ्‍ावत नाही.

---

**राज्यात प्रत्येक जिल्ह्यात जात पडताळणी समित्या स्थापन करण्याबाबत**

**(४०) ६८२४६ (१०-०१-२०१७). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रत्येक जिल्ह्यात जात पडताळणी समित्या स्थापन करण्याचा घेण्यात आलेला शासनाचा निर्णय अडचणीत आल्याचे दिनांक ७ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यावर जात पडताळणी समित्या स्थापना करण्यास शासनाला येणा-या अडचणीची कारणे काय आहे,
(३) असल्यास, सदरील अडचणी दुर करुन प्रत्येक जिल्ह्यात जात पडताळणी समित्या स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०४-२०१७) :** (१) नाही. जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या कार्यान्वित करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र, भाग ४-ब, क्रमांक १९७, दि.२८.७.२०१६ अन्वये समित्यांची रचना व त्यांचे कार्यक्षेत्र अधिसूचित करण्यात आलेले असून दि.२१.११.२०१६ पासून जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांचे दैनंदिन कामकाज सुरु करण्यात आलेले आहे.

(२) प्रश्न उद्भावत नाही.

(३) प्रश्न उद्भावत नाही.

(४) प्रश्न उद्भावत नाही.

---

**ज्येष्ठ नागरिकांसाठी नवे धोरण राबविण्याबाबत**

**(४१) ६८२८१ (१०-०१-२०१७). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ज्येष्ठ नागरिकांना उतार वयात सन्मानाने व कोणाच्याही आधाराशिवाय जगता यावे, यासाठी सार्वासाठी घरे, जोडप्यांना सहजीवनासाठी महिलांच्या बचत गटांसारख्या स्वयंसेवी संस्थांमार्फत विशेष काळजी घेणा-या सेवक-सेविका आदि सुरक्षित व सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी ज्येष्ठ नागरिकांसाठी नवे धोरण राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी नवीन धोरणांची अंमलबजावणी करायच्या दृष्टीने राज्यशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२१-०४-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) ज्येष्ठ नागरिकांना विविध सवलती देण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याचे सर्व समावेशक ज्येष्ठ नागरीक धोरण, २०१३ यास राज्य मंत्रिमंडळाने दिनांक ३०-९-२०१३ रोजी मान्यता दिलेली आहे. यामध्ये पुढील बाबींचा समावेश केला आहे.

अ) वृध्दासाठी अडथळा विरहित प्रवेशाची तरतूद करणे, या संकल्पोचा विकास करणे, ज्येष्ठ नागरिकांना सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत ओळखपत्र देणे. यासाठी स्वयंसेवी संघटनांची मदत घेणे.

ब) सार्वजनिक रुग्णालयामध्ये वयोवृध्द रुग्ण कक्ष स्थापन करुन स्वतंत्र खिडकीची व्यवस्था करणे, खाजगी संस्थामार्फत वृध्दामार्फत वृध्दाश्रमाप्रमाणे विशेष जिल्हा समाज कल्याण समितीस अधिकार देणे, वृध्दाश्रम चालविण्यासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत हेल्पलाईन वृध्दापकाळासाठी प्रकल्प व व्यवसायिक डेकेअर सेंटर कार्यक्रम राबविणे.

क) वृध्दापकाळातील आरोग्य शिक्षण कार्यक्रम राबविणे, बहुविध शिस्त विषयक दृष्टीकोन कार्याकल्पचा वापर करणे, फिरत्या वैद्यकीय पथकामार्फत उपचार व सोयीसुविधा देणे, वृध्दासाठी दवाखाना, टपाल कार्यालय, विद्युत व दूरध्वनी भरणा केंद्र, बस रेल्वे आरक्षण यासाठी स्वतंत्र निधी औषधीद्रव्ये, औषधपेढ्या, मोफत उपचार/मानसशास्त्रीय समुपदेशन इत्यादी.

(३) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

---

**आंबेगाव तालुका ग्रामीण ज्येष्ठ नागरिक संघाच्या समन्वय समितीने मांडलेल्या सुचनांबाबत**

**(४२) ६९०६२ (१०-०१-२०१७). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विधानसभेच्या नागपूर अधिवेशनात दिनांक १५ डिसेंबर, २०१५ लक्षवेधी सुचनेनुसार आंबेगाव तालुका ग्रामीण ज्येष्ठ नागरिक संघाच्या समन्वय समितीने मांडलेल्या १० मागण्या मान्य करण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या मागण्या आतापर्यंत पूर्ण केलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. राजकुमार बडोले (२१-०४-२०१७) :**(१) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याने आढळून येत नाही.

(२) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

(३) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

(४) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

(५) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

---

**कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नियमनातून भाजीपाला अणि फळे नियमनमुक्त केल्याबाबत**

**(४३) ७००१० (१६-१२-२०१६). श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाग मिळण्यासाठी शासनाने कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नियमनानुसार भाजीपाला अणि फळे नियमनमुक्त केल्याने निर्माण झालेल्या पेच प्रसंगावर मार्ग काढण्यासाठी मा.पणन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीमध्ये सरकार, प्रशासन या व्यक्तीरिक्त कोणत्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला आहे व सदर समिती किती दिवसात याबाबतचा अहवाल शासनास सादर करणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-०३-२०१७) :** (१) होय.
(२) सदर समितीमध्ये सरकारी प्रतिनिधी व्यतिरिक्त व्यापारी, माथाडी, बाजार समिती प्रतिनिधी, शेतकरी उत्पादक कंपनी, आडते, शेतकरी यांच्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला असून सदर समितीस १५ दिवसात अहवाल सादर करण्याचे निर्देश आहेत.
(३) सदर समितीच्या वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या आहेत.

---

**राज्यातील सावकारी कर्ज माफीबाबत**

**(४४) ७००३३ (१७-१२-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यातील २ हजार २७९ शेतकऱ्यांकडील सावकारांचे ४ कोटी ७१ लाख रूपयांचे कर्ज माफ केले, तथापि तब्बल १७ हजार ३२१ शेतकऱ्यांचे प्रस्ताव नाकारण्यात आल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) तसेच विदर्भातील ६१ कोटी ३४ लाखांची कर्जमाफी मिळाली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सावकारी कर्ज माफी योजनेचा लाभ ५ हजार ५३७ गावातील ४६ हजार ४९१ शेतकऱ्यांना मिळाल्याचे प्रशासकीय आकडेवारीवरून स्पष्ट होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने १९ हजार ५६९ गावामधील दोन लाख २३ हजार शेतकरी कर्जमुक्त झाल्याची शासनाची माहिती वस्तुस्थितीवर आधारित नाही, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या थांबविण्याच्या दृष्टीने शासनाने काेणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-०४-२०१७) :** (१) शासन निर्णय क्र. एमएलए-१०१५/ प्र.क्र.२५/ ७-स, दिनांक १० एप्रिल, २०१५ मध्ये नमूद करण्यात आलेल्या लाभार्थीच्या पात्रतेच्या निकषाची पूर्तता करणाऱ्या कर्जबाजारी शेतकऱ्यांना सावकारी कर्जमाफी योजनेचा लाभ देण्यात आला आहे. त्या अनुषंगाने मराठवाडयातील २६९२ शेतकऱ्यांकडील सावकारांचे रु. ४ कोटी ७० लाखाचे कर्ज माफ करण्यात आले आहे.
(२) होय.
(३) होय.
(४) नाही.

(५) शासन निर्णय दि. १०.०४.२०१५ नुसार विदर्भ व मराठवाडयातील ४६७३५ कर्जबाजारी शेतकऱ्यांना सावकारी पाशातून मुक्त करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**परभणी जिल्हा उद्योग केंद्राअंतर्गत सन २०१५-१६ मधील**
**९७ प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(४५) ७०५८१ (१६-१२-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा उद्योग केंद्राअंतर्गत सन २०१५-१६ मधील ९७ प्रस्ताव सप्टेंबर, २०१६ अखेर प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रस्ताव प्रलंबित असल्याचे कारणे काय आहेत,
(३) तसेच सदरहू प्रस्तावास मान्यता कैंव्हा देण्यात येणार आहे ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०३-२०१७) :** (१) होय.
(२) जिल्हा उद्योग केंद्र, परभणी कार्यालयास सुधारीत बीज भांडवल योजना साठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण योजना) अंतर्गत जिल्हा नियोजन समितीकडून सन २०१५-१६ मध्ये एकूण रु.३० लक्ष तरतूद उपलब्ध झालेली होती. सन २०१५-१६ मधील एकूण १०० कर्ज प्रकरणांना बँकाकडून मंजूरी प्राप्त झाली होती. त्यापैकी जेष्ठतेनुसार ६४ कर्जप्रकरणांना मंजूरी देण्यात आली.

जिल्हा नियोजन समितीकडे रु.२० लक्ष अतिरिक्त तरतूद प्राधान्याने मागणी करुनही समितीकडून निधी प्राप्त होवू शकलेला नाही. (सदरील योजना बिगर गाभा क्षेत्रात येत असल्याने) अतिरिक्त निधी न मिळाल्याने राहिलेली प्रलंबित तसेच बँकेकडून नंतर प्राप्त झालेली अशी एकूण ९७ कर्ज प्रकरणे माहे जुलै - २०१६ अखेर प्रलंबित होती.
(३) उपरोक्त प्रलंबित कर्ज प्रकरणांना सन २०१६-१७ आर्थिक वर्षात उपलब्ध निधीमधून ९७ कर्ज प्रकरणांपैकी ४२ कर्जप्रकरणांना निधी वितरित करण्यात आलेला असून, उर्वरित ५५ कर्ज प्रकरणी मंजूर आदेश प्रदान करण्यात आलेले आहेत.

---

**निफाड सहकारी साखर कारखाना चालविण्यास घेण्यास**
**विलंब झाल्यामुळे झालेल्या नुकसानीबाबत**

**(४६) ७०६६७ (१७-१२-२०१६). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड सहकारी साखर कारखाना चालविण्यास घेण्यास बॉम्बे, एस मोटर्स यांनी विलंब लावल्याने ह्या कालावधीत निफाड साखर कारखान्यावर कोट्यावधी रुपये व्याजाचा अतिरिक्त भार झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बॉम्बे, एस मोटर्स यांनी दिलेले कागदपत्र खोटे व अपूर्ण असल्यामुळे त्यांचा प्रस्ताव नाकारण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली काय, चौकशीअंती दोषी असलेल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१८-०४-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) होय. हे खरे आहे. मे.बॉम्बे एस.मोटर्स या कंपनीचे व व्यक्तीचे इनकमटॅक्स रिटर्न्स प्राप्त झालेले नसल्याने तसेच अनेक कागदपत्रे शंकास्पद असल्याने मे.बॉम्बे एस.मोटर्स यांचा प्रस्ताव नामंजूर करण्यात आला.
(३) व (४) प्रश्न उद्भ्‍ावत नाही.

---

**चाकण-आंबेठाण रस्ता (प्रजीमा २०) हा MIDC ला जोडणारा रस्ता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे हस्तांतरण करून सदर रस्त्याचे रुंदीकरण करण्याबाबत**

**(४७) ७२१२१ (१६-१२-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाकण-आंबेठाण रस्ता (प्रजीमा २०) हा MIDC ला जोडणारा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे हस्तांतरण करून सदर रस्त्याचे रुंदीकरण करण्याचा प्रस्ताव स्थानिक लोकप्रतिनिधिनी शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने हस्तांतरण करून रुंदीकरण करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१३-०४-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने वासुली फाटा ते पोतदार शाळा हा सुमारे ३ कि.मी. लांबीचा महामंडळाच्या हद्दीत येणारा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून महामंडळाकडे वर्ग करण्याबाबत मान्यता दिलेली असून, याबाबत महामंडळाने मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दि.०५/१०/२०१५ रोजीच्या पत्रान्वये अवगत केलेले आहे, सद्यस्थितील आंबेठाण चौक, चाकण ते आंबेठाण (अंगारमाळा) या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीच्या रस्त्याचे दुभाजकासह २४ मीटर रुंदीकरण व मजबुतीकरण महामंडळाकडून करण्याबाबत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने सदर रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचा व त्यांच्या अखत्यारीत असल्यामुळे या रस्त्याचे रुंदीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी करणे योग्य राहील.
(३) प्रश्न उद्भ्‍ावत नाही.

---

**राज्यात मराठा समाजाच्या वतीने मुकमोर्चे काढण्यात आल्याबाबत**

**(४८) ७२९०६ (२७-०१-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अॅट्रॉसिटी कायदा रदद करणे, मराठा आरक्षण सुरु करणे, इत्यादि विविध मागण्यासंदर्भात माहे सप्टेंबर व ऑक्टोंबर, २०१६ मध्ये राज्यातील विविध शहरांमध्ये व जिल्हयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी राज्यातील मराठा समाजाच्या वतीने विराट असे मुक मोर्चे काढण्यात येऊन संबंधित जिल्हाधिका-यांना मागण्यांचे निवेदने देण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त निवेदनात कोणकोणत्या मागण्या करण्यात आल्या आहेत व सदरहू मागण्यांवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-०३-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) मराठा समाजास शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग तयार करुन त्या प्रवर्गातील १६ टक्के आरक्षण देण्याकरीता दि.९/७/२०१४ रोजी सन २०१४ चा महाराष्ट्र शासन अध्यादेश क्र.१३ काढण्यात आला व दि.१५/७/२०१४ च्या शासन निर्णयान्वये मराठा समाजास शैक्षणिक व समाजिकदृष्टया मागास प्रवर्ग तयार करुन १६ टक्के आरक्षण देण्यात आले. दि.१४/११/२०१४ रोजी सदर अध्यादेशास व शासन निर्णयास मा.उच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशात हस्तक्षेप करण्यास नकार दिल्यामुळे याबाबबतचे प्रकरण मा.उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

तसेच कोपर्डी घटनेतील आरोपींना शिक्षा देण्याची बाब न्यायालयीन असून अॅट्रॉसिटी कायदा केंद्र शासनाचा असल्यामुळे सदर बाबीमध्ये राज्य शासन हस्तक्षेप करुन शकत नाही. उक्तिनवेदनातील उर्वरित मागण्या संबंधित विभागांकडे कार्यवाहीकरिता पाठविण्यात आल्या असून सदर मागण्यांवर कार्यवाही चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

---

## समृध्द जीवन मल्टिस्टेट मल्टीपर्पज को-ऑपरेटीव्ह सोसायटीमध्ये गुंतवणूक केलेल्या गुंतवणूकदारांचे पैसे परत मिळणेबाबत

**(४९) ७२९६२ (१७-१२-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) समृध्द जीवन मल्टिस्टेट मल्टीपर्पज को-ऑपरेटीव्ह सोसायटीमध्ये गुंतवणूक केलेल्या गुंतवणूकदारांचे पैसे माहे ऑक्टोबर,२०१६ पर्यंत मिळाले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्था ही बुडीत म्हणून जाहिर करुन त्यावर परिसमापकाची (लिक्विडेटर) नेमणूक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापपर्यंत किती गुंतवणकदारांना त्यांचे पैसे परत करण्यात आले असून किती गुंतवणूकदांचे पैसे देण्याचे बाकी आहेत,
(४) असल्यास, उर्वरीत गुंतवणूकदारांना पैसे लवकरात लवकर मिळणेबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-०४-२०१७) :** (१) होय,

(२) सदर संस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता आढळल्यामुळे केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १८.४.२०१६ रोजीच्या आदेशान्वये अवसायकाची (लिक्विडेटर) नेमणूक करण्यात आली आहे.

(३) संस्थेकडून ५,७७,९२३ ठेवीदारांपैकी ३,६२,०९६ ठेवीदारांना ठेवी परत करण्यात आल्या असून २,१५,८२७ ठेवीदारांना ठेवी परत करावयाच्या आहेत.

(४) सदर संस्था ही बहुराज्यीय सहकारी संस्था आहे. संस्था केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या अधिकार व नियंत्रण कक्षेत असून त्यांच्या मार्फत कार्यवाही चालु आहे.

(५) प्रश्न उद्‌भावत नाही.

---

**राज्यातील ज्येष्ठ नागरिकांचे वय ६५ वर्षांवरून ६० वर्षे करण्याबाबत**

**(५०) ७३६७८ (१०-०१-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ज्येष्ठ नागरिकांचे वय ६५ वर्षांवरून ६० वर्षे करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, सदरहु प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२१-०४-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) केंद्र शासनाच्या ज्येष्ठ नागरीक कायद्यानुसार ६० वर्ष व पुढील वय असणाऱ्या व्यक्तीस ज्येष्ठ नागरिक धोरणाप्रमाणे राज्यात ज्येष्ठ नागरिकांचे वय ६५ वर्ष निश्चित केलेले आहे. त्यामुळे वय वर्ष ६० ते ६५ वयोगटातील व्यक्तींना योजनेचे लाभ अनुज्ञेय होत नाहीत. ज्येष्ठ नागरीकांचे वयाची अट ६० वर्ष करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भावत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.